**उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना बदलीने पदस्थापना देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन आदेश क्र. टिआरएफ-०९२६/प्र.क्र.१८३/आस्था-२ (ई-१७७४४११)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०९ सप्टेंबर, २०२६

**संदर्भ:**-१. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५

२. सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०२१ प्र.क्र.४९/कार्या-१२, दि.१४.०७.२०२१

**शासन आदेश :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदींनुसार **उप जिल्हाधिकारी संवर्गातील खालील अधिका-यांची प्रशासकीय कारणास्तव** त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | सध्याचे पद | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| **१.** | **२.** | **३.** | **४.** |
| १. | श्री. बाबासाहेब वाघमोडे | नियुक्तीच्या प्रतिक्षेत | उप जिल्हा निवडणूक अधिकारी, धुळे, जि. धुळे |

सदरचे आदेश हे सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने तसेच अपर मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमीत करण्यात येत आहेत.

२. उप जिल्हा निवडणूक अधिकारी, धुळे या पदावर सध्या कार्यरत असलेल्या श्री. गंगाराम तळपदे, उप जिल्हाधिकारी यांच्या पदस्थापनेबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील. दरम्यानच्या कालावधीत श्री. गंगाराम तळपदे, उप जिल्हाधिकारी यांच्या सेवा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे संलग्न करण्यात येत आसून त्यांनी तात्काळ विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे रूजू व्हावे.

३. उपरोक्त नमूद उप जिल्हाधिकारी यांना पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्याकरीता दिनांक ०९.०९.२०२६ (म.नं.) पासून सध्याच्या कार्यरत पदावरुन एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. संबधित अधिकारी यांनी नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत रूजू अहवालाची प्रत/CTC https://maharevenuehr.in या पोर्टलवर अपलोड करावी.

४. संबंधित अधिकारी हे महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम १५ अन्वये विहित केलेल्या उक्त तरतूदींनुसार, पदग्रहण अवधी समाप्त होण्यापूर्वी बदलीच्या ठिकाणी रुजू झाले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचेविरुद्ध लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० व महाराष्ट्र नागरी

सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा “अकार्यदिन” (dies non) म्हणून गणला जाईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करू नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

७. सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

८. उपरोक्त अधिकाऱ्यांविरूद्ध भविष्यात कोणत्याही प्रकारचा फौजदारी अथवा इतर गुन्हा दाखल झाल्यास त्याबाबतचा सविस्तर अहवाल संबंधित विभागीय आयुक्त यांच्यामार्फत तात्काळ शासनास सादर करण्यात यावा.

९. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०९०९१८२९३३१०४८ असा आहे. सदर शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.09.09 18:30:44 +05'30'

**( महेश वरूडकर )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग.
२. श्री. बाबासाहेब वाघमोडे, उप जिल्हाधिकारी.
३. श्री. गंगाराम तळपदे, उप जिल्हाधिकारी.

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
३. मा. उप मुख्यमंत्री (रा. ऊ. शु., क्रिडा व यूवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
६. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

७. संबंधित जिल्हाधिकारी.
८. प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
९. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
१०. संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
११. संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
१२. उप सचिव, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, मुंबई.
१३. संबंधित उप जिल्हाधिकारी (विभागीय आयुक्त, नाशिक यांच्यामार्फत)
१४. उप सचिव (आस्था-२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१५. निवडनस्ती (कार्यासन आस्था-२).